**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले · अंक ७८ वा · गुरुवार ०३ ऑगस्ट २०२३ · पाने ४ · किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 78 | Date : 03/08/2023 | blow : Thursday | Page 4 | Price 4

## दिल्लीत टोमॅटो २०० रुपये प्रतिकिलो

नवी दिल्ली : सध्या टोमॅटोच्या दरात मोठी वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. मागणी वाढून पुरवठा कमी झाल्यामुळं दरात मोठी वाढ होत आहे. देशाची राजधानी दिल्लीत सध्या टोमॅटोची 'लाली' अधिक वाढल्याचं चित्र दिसत आहे. प्रतिकिलो टोमॅटोसाठी २०० रुपये द्यावे लागत आहेत. दर दिल्लीतील मदर डेअरीने सफाल रिटेल आउटलेटवर टोमॅटोची २५९ रुपये प्रतिकिलो दराने विक्री केली. प्रमुख टोमॅटो उत्पादक राज्यांमध्ये अतिवृष्टीमुळं पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळं टोमॅटोचे भाव एक महिन्याहून अधिक काळ झालं वाढले आहेत.

सध्या देशभरात टोमॅटो दरात मोठी वाढ झाली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी टोमॅटो **। पान२ वर**

## सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधी : शासन परिपत्रक दि.२६ सप्टें.२०१२ अन्वये जिल्हास्तरीय लोकशाही दिन महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. या दिवशी जनतेच्या तक्रारी गाऱ्हाणी ऐकण्याकरीता त्या त्या विभागातील विभागप्रमुखांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तरी माहे ऑगस्ट २०२३ चा लोकशाही दिन दिनांक ७ ऑगस्ट २०२३ रोजी आयोजित केला असून सर्व विभाग प्रमुखांनी आपलेकडील मागील महिन्यातील प्रलंबित निवेदन / अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्ज , आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही इ. माहितीसह सकाळी १० वाजता नवीन जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे उपस्थित रहावे. तसेच लोकशाही दिनास विनापरवानगी गैरहजर राहता येणार नसल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी कळविले आहे.

# विरोधकांच्या सभात्यागामुळे राज्यसभेत 'शांतते'त कामकाज



नवी दिल्ली : राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगेंना बोलू दिले जात नसल्याच्या आरोप करत बुधवारी विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला. त्यामुळे वरिष्ठ सभागृहात प्रश्नोत्तराचा तास तसेच उर्वरित कामकाज 'शांतते'त पार पडले. विरोधी बाकांवर एकही सदस्य नसल्याने या आठवड्यामध्ये राज्यसभेत विनाविरोध विधेयके मंजूर केली जात आहेत. खाणविषयक दुरुस्ती विधेयक बुधवारी संमत केले गेले.

विरोधकांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतल्यानंतर, खरगेंनी पत्रकारांशी संवाद साधताना सभागृहात मी बोलायला लागल्यावर दोन मिनिटांमध्ये माइक बंद केला जातो, ही बाब राष्ट्रपतींच्या नजरेला आणल्याचे सांगितले. खरगेच्या या विधानाचे पडसाद सभागृहात उमटले. दुपारच्या सत्राचे कामकाज सुरू होताच, खरगेंनी बोलू देण्याची विनंती उपसभापती हरिवंश यांना केली. खरगेंना ही परवानगी लगेच देण्यात आली. 'मी तुम्हाला बोलू देत आहे. नाहीतर तुम्ही सभागृहाबाहेर जाऊन माइक बंद केल्याचा आरोप कराल', असे हरिवंश खरगेंना म्हणाले. पण विरोधकांच्या गोंधळात खरगेंसमोरील माइक पुन्हा बंद झाला. त्याविरोधात विरोधकांनी सभात्याग केला. राज्यसभेत सकाळच्या सत्रातही विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केल्यामुळे सभापती धनखड यांनी प्रश्नोत्तराचा तास विनाअडथळा घेतला.

लोकसभेत विरोधकांच्या सातत्याने होणाऱ्या गोंधळामुळे कामकाज तहकूब करावे लागत असल्याने लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला नाराज झाले आहेत. जोपर्यंत विरोधकांच्या सभागृहातील वर्तनामध्ये सुधारणा होत नाही व कामकाज सुरळीत सुरू होत नाही, तोपर्यंत मी सभागृहात येणार नाही, असा निर्धार बिर्ला यांनी केला असल्याचे समजते. त्यामुळे बुधवारी बिर्ला लोकसभेत आले नाहीत. त्यांच्याऐवजी पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज पाहिले.

दिल्लीसंदर्भातील विधेयक लोकसभेत मंगळवारी मांडले गेले होते व त्यावर सभागृहात बुधवारी चर्चा होऊन ते संमत केले जाणार असल्याचे सांगितले जात होते. लोकसभेच्या कामकाज सूचीमध्येही विधेयकावरील चर्चेचा समावेश करण्यात आला होता. या विधेयकावर दुपारी दोन वाजता चर्चा सुरू होणार होती. मात्र, विरोधकांचा गोंधळ कायम असल्याचे **। पान२ वर**

## हे हिंदू राष्ट्र नाही अन् रामराज्यही नाही!; उद्धव ठाकरे यांची टीका

मुंबई : मणिपूर आणि हरियाणामध्ये सुरू असलेल्या हिंसाचारावरून त्या ठिकाणी डबल इंजिनचे सरकार आहे की नाही असा प्रश्न पडतो. मणिपूरमध्ये राज्यपाल महिला आहेत. या देशाच्या राष्ट्रपती महिला असताना महिलांवरील अत्याचार वाढला आहे. भाजप सरकार चालवू शकत नाही हे अनेक घटनांवरून दिसून येत आहे. देशात सध्या घडणाऱ्या घटनांवरून हे हिंदू राष्ट्र नाही आणि रामराज्यही नाही अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.



राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या पुण्यातील भाषणातील बारकावे पाहण्यासारखे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. सध्या भविष्याकडे न पाहता इतिहासात गुंतवून ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे भविष्यापासून सर्वांना दूर केले जात असून हे कृत्य देशाला मारक आहे. संभाजी भिडेंबद्दल योग्य अयोग्य काय आहे हे शासनाने ठरवावे आणि ठाम भूमिका घ्यावी, असे स्पष्ट मत ठाकरे यांनी व्यक्त केले. भिडे यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुजी म्हणत असतील तर ते बोलतात ते सर्वच बरोबर आहे असे म्हणावे लागेल. गुरुजींनी विद्यार्थ्यांना तरी चांगले धडे देण्याची गरज आहे, असा टोला ठाकरे यांनी फडणवीस यांचे नाव न घेता मारला.

## अंदाज ठरला खोटा, पाऊस आला मोठा! राज्यात आजपासून पुन्हा मुसळधार

नागपूर : राज्यात गेले दोन दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. हवामान खात्यानेदेखील ऑगस्ट महिन्यात पाऊस उसंत घेणार असा अंदाज वर्तवला होता. मात्र, तो खोटा ठरवत आज बुधवारी उपराजधानीत मुसळधार पाऊस सुरू झाला.जुलैच्या शेवटच्या दोन आठवड्यांमध्ये कोकण विभागात पडलेल्या मुसळधार पावसानंतर दोन दिवस पावसाने विश्रांती घेतली. मात्र आता पुन्हा कोकण विभागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून, बुधवारपासून



तीन ते चार दिवस राज्यात मुसळधार पाऊस पडू शकतो. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यातील पावसावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो, अशी माहिती भारतीय हवामान खात्याने दिली.मंगळवारी बांगलादेशच्या किनाऱ्यावर बंगालच्या उपसागरात तीव्र कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले. त्यानंतर बुधवारी हे क्षेत्र पश्चिम बंगालमध्ये गंगाखोरे ओलांडण्याची शक्यता आहे. ही प्रणाली पश्चिम आणि वायव्य दिशेकडे सरकत आहे. परिणामी बुधवारपासून राज्यात पाऊस पुन्हा एकदा सक्रिय होत असून रायगड,**। पान२ वर**


## सोलापूर ग्रामीण जिल्हयातील महामार्गावर विशेष पथकाकडून पेट्रोलिंग सुरू

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर ग्रामीण जिल्हयात अपघातांचे प्रमाण वाढले असून सर्वाधिक अपघात राष्ट्रीय महामार्गावर सायंकाळी पाच ते रात्री दहा या वेळेत घडत असल्याने राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ सोलापूर ते पूणे व राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ सोलापूर ते विजापूर या महामार्गावर होणारे अपघात व अपघातातील मृतांची संख्या कमी होण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आावश्यक होते.

त्याचाच एक भाग म्हणून पोलिस अधीक्षक व अप्पर पोलिस अधीक्षक यांचे आदेशाप्रमाणे सोलापूर पुणे महामार्गावरील सोलापूर ते शेटफळ , शेटफळ ते भिमानगर तसेच सोलापुर ते विजापूर या महामार्गावरील व्हनसळ फाटा ते नांदणी टोलनाका या दरम्यान विशेष पथक नेमून सायं. ०५ ते रात्री १० वाजेपर्यंत नाकाबंदी व महामार्ग गस्त करण्यात येत आहे, अशी माहिती पोलिस निरिक्षक अशोक सायकर यांनी दिली. या गस्ती दरम्यान महामार्गावर नोपार्किंग , विरूध्द दिशेने वाहन चालविणे , विना टेल लॅंम्प , विना रि फलेक्टर तसेच हायवेवर दोन्ही बाजूस थांबलेल्या वाहनांवर एम व्ही क्ट प्रमाणे कारवाई करण्यात येत असून केलेल्या कारवाईचा अहवाल नियंत्रण कक्षामार्फत घेण्यात येत आहे. दि. २८ जुलै पासून अशा एकुण २५ कसुरदार वाहन चालकांवर कारवाई करण्यात **। पान२ वर**

## ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या जाहिर सभेला मोठया संख्येने उपस्थित राहावे : चंद्रशेखर मडिखांबे

अक्कलकोट/प्रतिनिधी : दलित,मुस्लिम,ओबीसी,आणि इतर अल्पसंख्याक समाजावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात जनआक्रोश जाहिर सभेचे आयोजन अक्कलकोट येथील मल्लिकार्जुन एस.टी.स्टॅन्ड समोर ७ ऑगष्ट रोजी १ वाजता आयोजित केले आहे. या सभेला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष,बाळासाहेब आंबेडकर यांनी संबोधीत करणार आहे.तरी या सभेला मोठया संख्येने उपस्थित राहावे असे अवाहान वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे यांनी केले आहे. या कार्यक्रमाला



प्रदेश अध्यक्षा रेखाताई ठाकूर, जिल्हाप्रभारी प्रा.सोमनाथ साळुंखे,जिल्हाप्रभारी.डॉ. कांतीताई वातंत,राज्य उपाध्यक्ष अनिल जाधव,जिल्हाध्यक्ष श्रीशैल गायकवाड आदीसह सभेला मार्गदर्शन करणार आहे.तसेच जिल्ह्य व तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते या सभेस उपस्थिती राहणार आहे तरी तालुक्यातील तमाम दलित मुस्लिम बहुजन,ओबीसी, व इतर अल्पसंख्याक संख्येने उपस्थित राहून बाळासाहेब आंबेडकर यांचे विचार ऐकावेत असे आवाहन तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## माती परिक्षण आणि बीज संशोधनावर भर देणार : कृषी मंत्री धनंजय मुंडे

मुंबई : नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे सामर्थ्य आहे. खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी हवामान बदलाचा अंदाज घेऊन माती परीक्षण आणि बीज संशोधनावर अधिकाधिक भर द्यावा, अशा सूचना कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

आज मंत्रालयात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पासंदर्भात कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कृषी मंत्री श्री. मुंडे बोलत होते. या बैठकीस कृषी विभागाचे प्रधान सचिव परिमल सिंह,



उपसचिव संतोष कराड, अवर सचिव महेंद्र घाडगे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मंत्री श्री. मुंडे म्हणाले की, हवामान बदलामुळे उद्धवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास आणि त्यानुसार पिकाचे उत्पादन घेण्यासंदर्भात तसेच बीज निर्मिती प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील कृषी विद्यापीठामार्फत माती परिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना पोस्टाद्वारे माती परीक्षण करण्यासाठी पाठविण्याची सुविधाही संबंधित विभागाशी चर्चा करून उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांची मागणी आणि प्रतिसाद विचारात घेता आवश्यकता भासल्यास विद्यापीठातील माती परिक्षण केंद्रांची संख्याही वाढविण्यात येईल, असेही मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी सांगितले.

शेतकऱ्यांना सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायशीर करण्यास सहाय्य करणे हे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ५२२० गावात सुरु आहे. या पहिल्या टप्प्यातील जुन्या गावांमधील कामांना प्राधान्याने पूर्ण। **पान२ वर**

# महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना, यात अक्कलकोट तालुक्यातील एक ही खाजगी रुग्णालयात सहभाग नाही

## महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे सुरू

अक्कलकोट/विशेष प्रतिनीधी : राज्यातील नामवंत असलेल्या तीर्थक्षेत्र अक्कलकोटातील खाजगी रुग्णालयात महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेच्या सेवेकरिता एकही रुग्णालय पुढे न आल्याने अखेर अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाने प्रस्ताव सादर करुन सेवा देण्याची हमी घेतली आहे. याकरिता ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक राठोड यांनी पुढाकार घेतला आहे.

महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना ही रुग्णालयीन उपचाराबाबत गोर गरिबांसाठी फारच लाभदायक ठरली आहे. आतापर्यंत केवळ केसरी व पिवळे शिधापत्रिका असलेल्या नागरिकांनाच उपचार मिळत होते. मात्र आता पांढरे रेशन कार्ड असणार्या नागरिकांना देखील रु.५ लाखापर्यंत मोफत उपचार मिळणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील ७ तालुक्यात व सोलापूर शहरासह जिल्ह्यात ६३ रुग्णालयात उपचार होत आहे. केवळ अक्कलकोट तालुक्यात मात्र खाजगी रुग्णालयाने या योजनेत सहभागी न झाल्याने रुग्णांच्या नातेवाईकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अक्कलकोट शहरात पाचहून अधिक अद्यावत खाजगी रुग्णालये आहेत. मात्र त्यांनी सदरची योजना राबविणेकामी असमर्थता दर्शविली का विरोध? असा सवाल सर्वसामान्यांतून होत आहे. दोन्ही योजनांचा एकच कार्ड वाटप लवकरच सुरु होणार असून योजनेच्या एकत्रित अंमलबजावणीमुळे दोन्ही योजनामध्ये समाविष्ट उपचारांचा लाभ लाभार्थ्यांना मिळणार आहे.

प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत मागास, अंत्योदय व इतर कुटूंबिय लाभार्थी पात्र ठरतील तर महात्मा फुले आरोग्य योजनेत पिवळी, अन्नपूर्णा केसरी शिधापत्रिका धारकांसह शुभ्र शिधापत्रिका धारक शासकीय, निमशासकीय कर्मचारी व शिधापत्रिका नसलेले कुटूंब देखील याचा लाभ घेवू शकणार आहेत. जिल्ह्यात लाखो नागरिकांना या योजनेचा लाभ होत आहे. पूर्वी केसरी आणि पिवळ्या शिधापत्रिका धारकांना उपचार घेता येत होते. आता ती अट रद्द केली असून त्यामुळे अनेक गरजू कुटूंबियांना या बदलाचा लाभ होवू शकेल. मात्र अक्कलकोट शहरात असलेल्या अद्यावत काही रुग्णालयांनी सदर योजना राबविणेकामी पुढे न आल्याने तालुक्यातील कुटूंबियांना या योजनेलचा लाभ होणार की नाही असा सवाल व्यक्त केला जात आहे.

या जनआरोग्य योजनेमध्ये ९९६ व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमध्ये १ हजार २०९ उपचार घेत आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतील उपचार संख्या ३६० ने वाढविण्यात आलेली आहे. मात्र १ हजार ३५६ पैकी ११९ उपचार केवळ शासकीय रुग्णालयामध्येच मिळणार आहे.

अक्कलकोटमध्ये कोणतेच खाजगी रुग्णालय सदरची योजना राबविणेकामी पुढे न आल्याने अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक राठोड यांनी तातडीने प्रस्ताव सादर केलेले आहे.

१ हजार ३५६ पैकी १० ते १२ उपचार या ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. डॉ.अशोक राठोड यांच्या निर्णयाचे स्वागत होत असून तालुकावासियांतून समाधान व्यक्त होत आहे. मंजूरीचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यात यावे व शहरातील अद्यावत रुग्णालये आहेत. ही योजना राबविणेकामी असमर्थता दाखविली आहे. यांना कारणे दाखवा नोटीसीसह आरोग्य अधिनियमानुसार तातडीने कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे.

### ✻ सुविचार ✻

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

## तो वाढायला हवा...

एकीकडे शिक्षण आवश्यक मानले जाते तर दुसरीकडे कोटीच्या कोटी उड्डाण करणारे शैक्षणिक शुल्क पाहाता ते अनेकांना चैनीची गोष्ट वाटू लागते. शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी पुरेसे पैसे नसल्याने तमिळनाडूमधील एका महिलेने आत्महत्या केली. तिचा मुलगा महाविद्यालयात शिकत होता. ती एकल पालक होती असे प्रसिध्द झालेल्या वृत्तात म्हटले आहे. अपघातात मृत्यू झाल्यास सरकार मृत व्यक्तीच्या वारसाला आर्थिक मदत करते, असे तिला कोणीतरी सांगितले होते. त्यामुळे तिने चालत्या बससमोर स्वतःला ढकलून जीव दिला असे तपासात समजल्याचे पोलिसांनी सांगितले. शैक्षणिक शुल्क कमी वाटत असले तरी शिक्षणावरचा इतर खर्च मोठा आहे, असे पालक म्हणतात. कोरोनापश्चात अनेकांची आर्थिक परिस्थिती काहीशी डळमळीत झाली आहे. बचत संपुष्टात आली आहे. काही मुलांचे आई-वडील दोघेही कमावते असतात. तथापि त्यांना वेतन पुरेसे असते का की दोघांचेही वेतन घरखर्चालाच पुरत नसावे का? वाढती महागाई हे देखील याचे एक कारण आहे. एकल पालकांच्या बाबतीत तर परिस्थिती अजूनच बिकट असू शकते. अलीकडे शिक्षणाचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे पालक चिंतेत आहेत. घर खर्चाचा मेळ बसवताना त्यांचा जीव मेटाकुटीला येत असेल तर ते नवल नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील 'मन की बात' मधून कौशल्यविकासावर आणि कौशल्यांचा सन्मान करण्यावर भर दिला होता. पारंपरिक शिक्षणाला कालानुरूप कौशल्यांची जोड देणे ही सरकारची जबाबदारी आहे. तशीच ती पालकांचीदेखील आहे. सगळे सरकारच्या भरवशावर सोपवणे योग्य ठरेल का? तमिळनाडूमधील घटनेत त्या दुर्दैवी आईला मिळालेली माहिती चुकीची होती, असे वरकरणी तरी दिसते. मिळालेल्या माहितीची खातरजमा केली जाते का? तसे असते तर नैसर्गिक आपत्तीत जखमी आणि मृत्यू झालेल्यांच्या वारसांना सरकार मदत करते हे त्या दुर्दैवी मातेच्या कदाचित लक्षात आले असते. कोणत्याही परिस्थितीत पालकांनीदेखील सारासार विचार करायला हवा. शैक्षणिक शुल्काच्या ओझ्याने ती माता अगतिक झाली असू शकेल. तथापि कोणत्याही समस्येचे आत्महत्या हे उत्तर असू शकत नाही. आत्महत्येने प्रश्न संपत नाहीत उलट वाढतात. उपरोक्त घटनेतदेखील त्या मुलांना वडील नव्हते आणि आता त्यांनी त्यांची आईदेखील गमावली आहे. आईच्या आत्महत्येने त्यांचे प्रश्न वाढले की सुटले? खुंटलेला सामाजिक संवाद हे देखील या उणिवांचे एक कारण आहे. तो वाढायला हवा.

पान १ वरुन

## विरोधकांच्या सभात्यागामुळे ..

सांगत कामकाज तहकूब करण्यात आले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मणिपूरमधील दोन महिलांना राज्यसभेवर नियुक्त करावे, अशी मागणी विरोधी पक्षांनी बुधवारी केली. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या सुष्मिता देव यांनी ही सूचना केली, विरोधी गटाच्या एका शिष्टमंडळाने राष्ट्रपतींची भेट घेतली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संघर्षग्रस्त मणिपूरमधील परिस्थितीवर संसदेला संबोधित करण्यास सांगण्याची विनंती केली. ''मणिपूरमधील वेगवेगळय़ा समुदायातील दोन महिलांना राज्यसभेवर नामनिर्देशित करणे हे राज्यातील महिलांवर होणारे गंभीर नुकसान आणि उल्लंघन सुधारण्यासाठी एक लहान उपाय म्हणून काम करेल,'' असे देव यांनी यावेळी सांगितले.

## अंदाज ठरला खोटा, पाऊस ..

रत्नागिरीला बुधवार, गुरुवारसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. रायगड आणि रत्नागिरीत या दोन दिवसांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

सिंधुदुर्गात मात्र गुरुवारपर्यंत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईमध्येही बुधवार आणि गुरुवार हे दोन दिवस तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता असून गुरुवारी पालघर आणि ठाणे जिल्ह्यालाही ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पालघर आणि ठाणे जिल्ह्यात शुक्रवारीही तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकेल. पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसरालाही बुधवार आणि गुरुवारी ऑरेंज अलर्ट आहे. या दोन दिवशी पुणे आणि सातारा घाट परिसरामध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर कोल्हापूर घाट परिसरामध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकेल. पुणे आणि सातारा घाट परिसरामध्ये शनिवारपर्यंत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचे सातत्य कायम असण्याची शक्यता आहे.

बुधवार आणि गुरुवारी उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्येही पावसाची शक्यता असून नंदूरबार, जळगाव, नाशिक या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. मराठवाड्यात जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर येथे बुधवारी तर संभाजीनगर येथे गुरुवारी मेघगर्जनेसह पावसाची उपस्थिती असेल. विदर्भात सगळ्याच जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. ३ ऑगस्टनंतर तीव्र कमी दाबाचे क्षेत्र हळूहळू कमकुवत होत असल्याने गेल्या दोन आठवड्यांप्रमाणे दीर्घकाळ मुसळधार पाऊस अनुभवावा लागणार नाही, असे सध्याचे चित्र आहे.

# महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या वाघाचा हा वैचारिक भ्रष्टाचार आहे

दिल्ली पुढे सह्याद्री हळूहळू झुकताना दिसतेय.इतिहासातही मराठीबाणा,ब्राह्मणी व्यवस्थेसमोर अनेकदा नतमस्तक झालेलाच.जहागिरदार-सरदारांनी देशहित आणि समाजहित न पाहता वैयक्तिक संपत्ती आणि वतनांचा हव्यास केला तर कधी ना कधी शरणागती पत्कारण्याची वेळ येतेच.शिवाजी महाराजांनंतर ज्यांना महाराष्ट्रात जाणता राजा म्हणून संबोधलं जायचं असे शरद पवार साहेब दिल्लीश्वेरां समोर हळूहळू झुकाताना दिसत आहेत.तसंही महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या अनेक वाघांनी दिल्लीचा आश्रय घेतलाच आहे.अनेक राजकारणी काका-बाबा ऐवजी मोदी-शहा मला वाचवा अशी आर्त किंकाळी मारत आश्रय मागत आहेत.जनतेची अर्थात देशाची लूटलेली संपत्ती शाबूत ठेवणे व तुरूंगाच्या भिंती आड जाण्याचं संकट येऊ नये म्हणून कोणत्याही अटी-शर्ती न ठेवता निमूटपणे शरणागती पत्कारीत आहेत.शिवसेनेच्या संजय राऊतांनी निधडी छाती दाखवत, जेल मध्ये जाणं पसंद केलं मात्र हा सह्याद्रीचा वाघ दिल्ली समोर वाकला नाही.किंबहुना जेलमधून बाहेर येताच जास्त आक्रमक झालेला दिसतोय.तिकडे नवाब मलिकही न वाकता आत जाऊन भेकाड,डरपोक आणि शेपटया घालून पळ काढणाऱ्या वाघांना जनता कधीच साथ देत नाही. महाराष्ट्रातील जनता फार सूज्ञ आहे, येणाऱ्या काळात अशा भेकाड,पळपुटयांना ती कायमच घरी बसवेल.डरपोकांचा बाजार उठविल्या शिवाय शिव-शाहु-फुले-आंबेडकरांची महाराष्ट्रातील जनता स्वस्थ बसणार नाही.महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेला लाचारी नकोय,देश आणि महाराष्ट्राची मजबूत तटबंदी हवीय.महाराष्ट्र हा कायम स्वाभिमानी, ताठ कण्याचा होता, आहे आणि असेल हे जनता दाखवून देईल.सरदार आणि जहागिरदार असे अनेकदा सोडून गेलेले आहेत, जनतेला त्याचा फरक पडत नाही. येणाऱ्या काळात प्रजा देशबुडव्यांना गाडल्या शिवाय राहणार नाही हे मात्र निश्चित.पंतप्रधान मोदींना पुण्यात टिळकांच्या नावे पुरस्कार मिळाला म्हणून ते आले होते.देशातल्या महिला सुरक्षित नसताना,त्यांच्यावर अश्लाघ्य व घृणास्पद अत्याचार होत असताना, मोदीजींनी हा पुरस्कार घ्यायला नको होता.मणिपूर मधील दोन महिलांच्या व्हायरल विडीओ वरून संपूर्ण देशात त्यांच्या व तेथील स्थानिक भाजप सरकारच्या विरोधात असंतोष खदखदतोय.संबंध देशभर आंदोलने होत आहेत. संताप पसरलाय.असे वातावरण असतानाही मोदीजी हा पुरस्कार घेण्यास येतात.शरमेची गोष्ट म्हणजे मोदी साहेब पुरस्कार घेऊन थांबत नाहीत तर बेटी-बचाओ-बेटी पढाओचा नारा या ठिकाणी देतात.देशातल्या आया-बहिणींनी याचा विचार करायला हवाय.देशाचा कारभार अश्या लोकांच्या हातात राहिला तर मणिपुर मध्ये घडलेली घटना प्रत्येक राज्यात आणि घरात घडायला वेळ लागणार नाही.देशातील जनता महागाई-बेरोजगारीच्या जात्यात भरडली जात असताना, जनतेचा आमच्यावर विश्वास आहे म्हणतात.भारताच्या विकासात जग त्यांचं भविष्य शोधतंय असा उच्चार करून फेकुगिरीचा नमूना नेहमी सारखा सादर करतात.दुसरं ज्यांनी देशात प्रथमतः महिलांना ३३% आरक्षण दिलं. जे स्वतः ला छत्रपती शिवाजी महाराजांचे वैचारिक वारस म्हणवून घेतात असे पवार साहेब त्यांच्या मांडीला-मांडी लावून मंचावर बसतात.महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या वाघाचा हा वैचारिक भ्रष्टाचार आहे. महाराष्ट्राचे दुसरे माजी मुख्यमंत्री व देशाचे माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे या मंचावर होते.वास्तविक शरद पवारांच्या नामोउल्लेखा नंतर प्रोटोकाल नुसार सुशिलकुमार शिंदेंच्या नावाचा उच्चार मोदीजींकडून अपेक्षित होता.मात्र सुशिलकुमार शिंदे दलित असल्याने त्यांचं नाव सर्वात शेवटी घेतलं.पुरस्कार देणाऱ्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची नावे प्रथम आणि देशाच्या सत्तेची सर्वोच्च पद भूषविलेल्या व्यक्तीचं नाव सर्वात शेवटी,हे अपमानकारक आहे.अनेकांना माझं म्हणण्यात तथ्य वाटणार नाही पण हे वास्तव आहे.सुशिलकुमार शिंदे हि मानहानी निमूटपणे सहन करतील कारण मनूवादी व्यवस्थेचे ते सुद्धा शरणार्थी आहेत.

सर्व समाज घटकातील नेतृत्वांची शरणागती आणि गुलामीकडे वाटचाल सुरू असताना.(अपवादात्मक नेते सोडून)केवळ महाराष्ट्रातील जनता स्वाभिमानी आहे,जनतेला लाचारी मान्य नाही.२०२४ ला हि ताठ कण्याची जनता यांना धडा शिकवेल असा दृढ विश्वास आहे.

**-विशाल हिवाळे मो.९०२२४८८१३३**
**(संविधान अभ्यासक आणि प्रचारक)**

# साहित्यसम्राट लोक शाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्या अशी मागणी करत १०३ किलोचा हार अर्पण करून यशवंत भाऊ नडगम यांनी केली अभिवादन



पुणेः देशाला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे कळले नाहीत असे मत व्यक्त करत अण्णाभाऊ साठे यांना भारत रत्नपुरस्कार द्यावा अशी मागणी दलित पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) महाराष्ट्र प्रदेश सचिव यशवंत भाऊ नडगम यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने आयोजिलेल्या सभेत बोलत होते.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साहित्यरत्न लोकशाहीरअण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याला १०३ किलोचा भव्य दिव्य पुष्पहार अपर्ण करुन अभिवादन केले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्याबाबत केंद्र व राज्य सरकारवर टीका करताना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे रशियाला कळले. मात्र आपल्या भारताला कळले नाही अशी खंत व्यक्त केली. गोरगरीब वंचितांसाठी निर्माण केलेलं लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य देशातल्या अन्य भाषांत भाषांतर करून देशासह जगापर्यंत पोहोचवलं पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

याबाबत महाराष्ट्र सरकारचं दुर्लक्ष होत असल्याची टीका करत लोकशाहीर अण्णा भाऊ साठेयांचा खऱ्या अर्थाने गौरव करायचा असेल तर त्यांना भारतरत्न पुरस्कार दिला पाहिजे आणि केंद्र सरकारकडे आपली मागणी असणार आहे. नाहीतर दलित पँथर रस्त्यावर येऊनआंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला त्यानंतर पुणे जिल्हा मातंग समाज व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती समितीच्यावतीने आयोजित लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या दुर्मिळ चित्र प्रदर्शनास भेट दिली. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दलित पँथर चे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भाऊ नडगम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम घेण्यात आले आहे यशवंत चॅम्पियन कप (फुटबॉल स्पर्धा) व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे कथित ५०० फकीरा कादंबऱ्या (पुस्तक)वाटप करण्यात आले आहे व हलगी वादन यांची जंगी स्पर्धा ठेवण्यात आली होती सर्वांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिल्या बद्दल सर्वांचे यशवंत भाऊ नडगम यांनी आभार मानले व त्यांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला यावेळी दलित पँथर चे सर्व नेते कार्यकर्ते महिला भगिनी उपस्थित होते

# अण्णाभाऊ साठे व टिळकांच्या आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिक्षण घ्यावे : चंदनशिवे



अक्कलकोट/प्रतिनिधी : साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि बाळ गंगाधर लोकमान्य टिळक या महापुरुषांच्या लोककल्याण व देशाभिमानाच्या आदर्श डोळ्यासमोर ठेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे असे आव्हाहन समाज कल्याण सोलापूर विभागाचे बार्टिचे अधिकारी नालंदा चंदनशिवे यांनी केली आहे. दुधनी येथील श्री शांतलिंगेश्वर इंग्लिश मेडियम स्कूल येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०३ व्या जयंती आणी लोकमान्य टिळक यांच्या स्मृतिदिन संयुक्त रित्या आयोजित केली होती. प्रारंभी दोन्ही महा पुरुषांच्या प्रतिमेश उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) चे जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी हे होते. सदर कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या नालंदा चंदनशिवे,सह शिक्षिका कुलकर्णी जि एल्, रिपाइंचे सैदप्पा झळकी यांनी मनोगत व्यक्त करण्यात आली.

सदर कार्यक्रमात मुख्याध्यापिका सौ येरटे ए. एल, समाजकल्याण विभाग सोलापूरचे नालंदा चंदनशिवे, रिपाइंचे सैदप्पा झळकी, अशोक कबाडे,गोरखनाथ धोडमनी, महेदिमिंया जिडगे, रमेश धोडमनी,निवृत्त कर्मचारी शंकर देसाई, सह शिक्षिका कुलकर्णी, शाळेचे क्लार्क कोळी एम.व्ही,आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुख्याध्यापिका सौ.येरटे यांनी तर शेवटी कोळी यांनी आभार मानले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सौ. पोतदार म्याडम,बुरकल,कामनळ्ळी,नागूर,चलगेरी व परमशेट्टी यांनी परिश्रम घेतली आहे.

## सोलापूर ग्रामीण जिल्हयातील

आली असून त्यांचे कडून २६ हजार रूपये दंड वसूल करण्यात आला आहे. विशेष मोहिम दरम्यान म्हणजे २८ जुलै पासून आजतागायत सायंकाळी ५.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत उपरोक्त राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचे प्रमाण कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. सोलापूर ग्रामीण जिल्हयातील वाढत्या अपघातांना प्रतिबंध करणे कामी विशेष मोहीम अशीच पुढे चालू ठेवण्यात येणार आहे, असे श्री. सायकर यांनी सांगितले .

## दिल्लीत टोमॅटो २००

आहे, त्यांना मोठा फायदा होत आहे. सध्या ज्या प्रमाणात टोमॅटोला मागणी आहे ,या प्रमाणात पुरवठा होताना दिसत नाही. परिणामी टोमॅटोचे दर मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. प्रतिकिलो टोमॅटोसाठी १७० ते २०० रुपये द्यावे लागत आहेत. राष्ट्रीय राजधानीतील किरकोळ किंमती अलीकडेच खाली येऊ लागल्या होत्या. परंतू कमी पुरवठ्यामुळे पुन्हा टोमॅटोच्या किंमती वाढल्या आहेत. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, टोमॅटोची किरकोळ किंमत बुधवारी २०३ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचली, तर मदर डेअरीच्या सफाल रिटेल आउटलेटवर त्याची किंमत २५९ रुपये प्रतिकिलो होती.

## माती परिक्षण आणि बीज संशोधनावर

करण्यात यावे, गाव हा घटक मानून प्रकल्पाचे लोकसहभागीय नियोजन करावे. महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रत्येक प्रकल्प गावात शेतीशाळेचे आयोजन करावे, असेही मंत्री श्री.मुंडे यांनी सांगितले.

मागील काही वर्षातील हवामानातील बदलामुळे शेतीवर दुष्परिणाम जाणवत आहे. भविष्यातही हवामान बदलामुळे शेती क्षेत्राचे नुकसान होऊ शकते, यासाठी पूर्व नियोजन आणि उपाययोजना आखणे गरजेचे आहे. तसेच खरीप व रब्बीत घेतली जाणारी आंतरपिके आणि कडधान्य उत्पादनात वाढ व्हावी आणि बदलत्या वातावरणाला अनुकूल असे बियाणे विकसित व्हावे यासाठी कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठाच्या समन्वयाने नवीन संशोधन करण्यावर देखील भर देण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज मध्ये सहभाग नोंदवावा : सचिन जाधव

### विद्यार्थ्यांमधील नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजची सुरवात

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी व नवउद्योजगांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन जाधव यांनी केले आहे.

या उपक्रमाचे अनावरण दि. १५ जुलै २०२३ रोजी मा. मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील सर्व जिल्ह्यातील विद्यार्थी नवउद्योजक व त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेवून त्यांना आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे तसेच या नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ज्ञ मार्गदर्शन, निधी व आवश्यक पाठबळ पुरवणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी राज्यातील कोणत्याही महाविद्यालय अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी/विद्यार्थिनी किंवा जास्तीत जास्त ३ विद्यार्थ्यांचा समूह पात्र असेल. तसेच अर्ज करण्यासाठी विद्यार्थी/विद्यार्थिनी/समूहाकडे नावीन्यपूर्ण संकल्पना असणे आवश्यक आहे.

हा उपक्रम ३ टप्प्यात आयोजित करण्यात येणार असून प्रथम टप्प्यात राज्यातील महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इतर शैक्षणिक संस्थांची नोंदणी करण्यात येत आहे तदनंतर त्या संस्थेतील विद्यार्थी स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये आपल्या नवसंकल्पनांचे अर्ज करू शकतील. संस्थास्तरावर उत्तम दोन संकल्पनांची निवडही प्रथम टप्यात करण्यात येईल. या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्यात जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेल्या उत्तम दोन संकल्पनांमधून, सर्वोत्कृष्ट १०० संकल्पनांची जिल्हास्तरीय सादरीकरणासाठी निवड करण्यात येईल. निवडलेल्या १०० नवउद्योजकांसाठी विशेष एकदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यातील सादरीकरण सत्रातून सर्वोत्कृष्ट १० विजेते निवडले जातील. सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांमध्ये, ३०% महिला, ५०% औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे विद्यार्थी व One District One Product (ODOP) संबंधित नवसंकल्पनांना प्राधान्य असेल. जिल्हास्तरीय विजेत्यांना प्रत्येकी रु. १ लाख बीज भांडवल देण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यातील १० अश्या एकूण ३६० नवउद्योजकांना १२ महिन्यांचा विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम दिला जाणार असून इन्क्युबेशन प्रोग्रामनंतर या ३६० नवसंकल्पनांचे राज्यस्तरीयसादरीकरण करण्यात येणार असून यातून सर्वोत्कृष्ट १० नवउद्योजकांना प्रत्येकी रु.५ लाखांचे बीज भांडवल देण्यात येणार आहे. या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे शैक्षणिक संस्था व जिल्ह्यांना या उपक्रमाची व्याप्ती वाढवून राज्याची नावीन्यपूर्ण परिसंस्था बळकट करण्यासाठी विशेष परितोषिकेही दिले जाणार आहेत. या उपक्रमाच्या अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थळ www.msins.in अथवा स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या www.schemes.msins.in या पोर्टलला भेट द्यावी.

नविन्यता, कल्पकता यांना भौगोलिकतेच्या मर्यादा नसतात, त्या कुठेही यशस्वी होऊ शकतात. नवकल्पनांना योग्य पाठबळ मिळण्याची आवश्यकता असते परंतु योग्य व्यासपीठ व मार्गदर्शनाअभावी चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत. राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग कार्यरत आहे, या उपक्रमात जास्तीत जास्त शैक्षणिक संस्था व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन जाधव यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बदलत्या हवामानानुसार शेतकऱ्यांनी शेती करणे काळाची गरज : राहुल मते

नळदुर्ग/प्रतिनिधी : बदलत्या हवामानानुसार शेतकऱ्यांनी शेती केली तरच शेतकऱ्याला तारणार आहे .कारण आज बदलत्या हवामानाचा मानवी शरीरावर, मनावर परिणाम होत असून याचा अनिष्ट परिणाम शेतीवर ही होताना दिसत आहे .हवामान बदलामुळे अनेक मोठी पिके धोक्यात येत आहेत. हवामान बदलाची कारणे व परिणाम याबाबत माहिती देताना राहुल मध्ये बोलत होते शहापूर ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद येथे आज दि. १/८/२०२३ रोजी अल्प खर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसार अभियानांतर्गत शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्यात ते मार्गदर्शक म्हणून बोलत होते .पुढे बोलताना राहुल मते म्हणाले जागतिक स्तरावर पृथ्वीच्या वातावरणात नैसर्गिक व मानवनिर्मित कारणामुळे हरितगृह वायूची वृद्धी व तापमानात वाढ होऊन त्याचे परिणाम पाऊसमान व सृष्टीतील जीवनमानावर होताना दिसत आहे .त्याला हवामान बदल असे म्हणतात. पाऊस ,आर्द्रता, सूर्यप्रकाश ,वारा आणि तापमान हे हवामान बदल निश्चित करणारे घटक आहेत. हवामान बदलामुळे अनियमित अवकाळी पाऊस सरासरी तापमानात वाढ ,घट अति थंडी, धुके, गारपीट, वादळ, नद्यांच्या प्रवाहात



घट बर्फ वितळणे पूर चक्रीवादळ दुष्काळ इत्यादी परिणाम दिसतात १९ व्या शतकापासून पृथ्वीच्या तापमानात हळूहळू वाढ झालेली दिसते .अलीकडच्या काळात हवामान बदलाचे परिणाम तीव्रतेने जाणवत आहेत यावर मात करायचे असेल तर शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानाचा अंदाज घेऊन हवामानानुकूल शेती करणे गरजेचे आहे. कोरडवाहू व अल्पभूधारक शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारायचे असेल तर अल्प खर्चिक शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसाराचा उपयोग करून आपण शेती केली पाहिजे असे ते म्हणाले. प्रारंभी परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांनी प्रास्ताविक केले व अफार्म पुणे, परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजापूर तालुक्यातील चार गावात या विषयावर काम चालू आहे या कामाची माहिती दिली . याच कार्यक्रमांमध्ये तृणधान्य प्रोत्साहन अभियानांतर्गत ही शेतकऱ्यांना बी बियाण्याचे किट वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमास शेतकरी ,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा कार्यकर्ते नानासाहेब पाटील होते. या कार्यक्रमात बचत गटातील शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या .शहापूर गावांमध्ये गेल्या वर्षापासून अल्पकर्तिक शाश्वत शेती पद्धती बाबत परिवर्तन सामाजिक संस्था जनजागृती चे काम करीत आहे. या कामास शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य केले आहे याबाबत मारुती बनसोडे यांनी सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# चेअरमन अभिजीत पाटील यांच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त श्री विठ्ठल कारखान्यावर मोफत सर्व रोग निदान शिबिर संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधी : वेणू नगर गुरसाळे विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर सोमवार ३१ ७ २०२३ रोजी रोजी सकाळी अकरा वाजता श्री अभिजीत आबा पाटील यांच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त याची औचित्य साधून प्राथमिक आरोग्य केंद्र रोपळे डॉक्टर निकम यांचे लुपित स्पेशलिस्ट हॉस्पिटल विठाई मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल तीन रस्ता पंढरपूर येथे व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व निदान शिबिर आरोग्य तपासणी शिबिर रक्तातील तपासण्या व रक्तातील साखर ईसीजी अस्तिरोग व स्त्रीरो अशा अनेक तपासण्या त्यावरील उपचार मोफत करण्यात आले सदर शिबिराचे उद्घाटन श्री बीपी रोंगे सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले वेरी कलीची संस्थापक सचिव श्री बीपी रोंगे सर कारखान्याची आर्थिक परिस्थिती कमकुवत असताना सुद्धा कारखान्याचा गळीत हंगाम २०२२ २३ चा हे उत्तम उद्योजक असून मत कारण सांभाळत सामाजिक बांधिलकी ही ते जपत आहेत त्यानुसार या मोफत आरोग्य शिबिराचे नियोजन पंढरपुरातील नामांकित डॉक्टर उपस्थित त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान केले.

याप्रसंगी डॉक्टर निकम हे मनाली की सर्व रोग निदान शिबिर घेण्याचा उद्देश एकच आहे की चाळीसाव्या सांधेदुखी ब्लड प्रेशर शुगर अशा अनेक आजारांना बळी पडावे लागत आहे बेरीज लोकांना आजारापासून सावध केली तर पुढील त्यांचा अनर्थ टाळला जातो प्रास्ताविक मध्ये कारखान्याचे कार्यकारी अधिकारी श्री गायकवाड यांनी सर्वयोग निदान शिबिराचे स्पष्टत्व थोडक्यात सांगून महत्व थोडक्यात सांगून दिले यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राची डॉक्टर रोपळे येथील डॉक्टर अनुजा शेंडगे डॉक्टर प्रशांत निकम डॉक्टर विशाल पडे सचिन देवकते सचिन गुटाळ डॉक्टर स्नेहल रंगे डॉक्टर पूजा पवार डॉक्टर अनिरुद्ध नाईक नवरे रोपळे प्राथमिक आरोग्य केंद्राचा सर्व संभाजी भोसले कालिदास पाटीलस्टाफ परिश्रम घेतले व ५२८ रोगांनी याचा सदर कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन सौ प्रेम लता रोंगे संचालक दिनकर चव्हाण संभाजी भोसले कालिदास पाटील धनंजय काळे प्रवीण कोळेकर नवनाथ नाईक नवरे सिद्धेश्वर बंडगर कलावती खटके सौ. रणदिवे कारखान्याची कामगार सभासद हितचिंतक व कार्यकर्ते शेवट कारखान्याचे केन मॅनेजर बंडगर यांनी आभार मानले



जिल्हा परिषद शाळा गोगाव येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दयानंद चोळे हे होते प्रतिमापूजन पुंडलिक वाघमारे सर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर विविध घटनेची माहिती शंकर कारभारी सर यांनी सांगितले यावेळी महादेव चव्हाण , अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, आलूरे मॅडम उपस्थित होते

## दुःखद निधन



अक्कलकोट :कर्जाळ येथील अक्कलकोट आगार एस टी चे सेवानिवृत्त चालक कै.तिप्पणा चंद्रशेखर फताटे (वय ६९) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे.ग्रामीण विद्या विकास मंडळ चपळगाव ता.अक्कलकोट येथील शिक्षक चंद्रशेखर फताटे सर यांचे वडील होत.

हुसेनी सोनकांबळे यांचे अल्पशा आजाराने निधन



भीम नगर गोगाव येथील सदन शेतकरी कलेणी उर्फ हुसेनी मौला सोनकांबळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे त्याचे मयत आज ठीक ,१२ वाजता होणार आहे, पुणे येथील कात्राज येथे असलेले अंबिका क्रेन मालक शिवशरण सोनकांबळे यांचे ते भाऊ आहेत

# जनता विद्यालय नांदुर्डी येथे विज्ञान छंद मंडळाची स्थापना उत्साहात संपन्न

निफाड/प्रतिनिधीः जनता विद्यालय नांदुर्डी ऑक्सिजन दिनाच्या निमित्ताने विज्ञान छंद मंडळाची स्थापना व उद्घाटन करण्यातआले.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म.वि.प्र. सेवक सोसायटी संचालक मा जाधव डी जी होते व्यासपीठावर पर्यवेक्षक बिन्नर बी पी शिंदे टी जी पवार व्ही के पाटील आर एस शिंदे आर आर मोतींगे एस आर पगारे आर व्ही श्रीमती घुमरे आर एस गोतरने एन जे सोनवणे जे पी उपस्थित होते . या सर्व मान्यवरांच्या शुभ हस्ते विज्ञान छंद मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे विज्ञान शिक्षक पगारे आर व्ही यांनी केले. शिंदे टी जी पगारे आर व्ही निफाडे बी के शिंदे आर आर पवार व्ही के यांनी विज्ञान छंद मंडळ स्थापन करण्यामागचा हेतू व उद्देश समजावून दिला.विज्ञान व तंत्रज्ञान म्हणजे काय व मानवाने विज्ञानाचा वापर कल्पकता वाढवण्यासाठी कसा करता येऊ शकतो, याबद्दल मार्गदर्शन केले . विचारक्षमता,वैज्ञानिक दृष्टिकोन,कल्पकता या सर्व गोष्टी मुलांमध्ये रुजाव्या यासाठी विज्ञान छंद मंडळाची स्थापना केली जाते असे प्रतिपादन केले.प्रत्येक गोष्ट तार्किक पद्धतीने पडताळून मगच ती स्वीकारली पाहिजे प्रत्येक गोष्टी मागे असणारा कार्यकारण भाव जाणून घेणे हे महत्त्वाचे आहे याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी मुख्याध्यापक डावरे डी ए यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुलभुत विज्ञानातील विविध तत्वे,संबोध, समजावुन घेवुन त्यांचे



सामान्यीकरण करून आपल्या रोजच्या आयुष्यामध्ये कशाप्रकारे उपयोगात येते हे उदाहरणासह स्पष्ट केले.सी.वी.रमण यांचे संशोधन तसेच व्हॅक्सिन मेकॅनिझम,मेरी क्युरी व त्यांचे शोध व संशोधन तसेच अब्दुल कलाम या शास्त्रज्ञांच्या कार्यातून वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागतोअध्यक्षीय भाषणात सोसायटी संचालक श्री जाधव डी जी यांनी कल्पकता ही व्यक्तिमत्व विकासासाठी व संशोधकवृत्ती वाढीसाठी किती आवश्यक आहे याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती वाढवावी आणि विज्ञानातील संशोधक निर्माण व्हावे यासाठी विज्ञानाच्या विविध स्पर्धेत सहभाग घेत जिज्ञासू वृत्तीचे दर्शन घडवावे तसेच विविध विज्ञान प्रकल्प भारतीय शास्त्रज्ञांच्या शोधांचा अभ्यास करून नावीन्यपूर्ण प्रकल्प तयार करावे असेही आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.व विज्ञान छंद मंडळातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार पुष्प गुच्छ देऊन करण्यात आला विज्ञान छंद मंडळ उद्घाटन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व विज्ञान शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

# हन्नुर येथे विविध ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

अक्कलकोट/ गौतम बाळशंकरः लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०३ वी जयंती हन्नुर येथील ग्रामपंचायत मध्ये साजरी करण्यात आली, सरपंच सौ सोनाली तळवार यांच्या शुभहस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अण्णाभाऊ साठे यांच्या संदर्भातील विचार ग्राम.पंचायत सदस्य गौतम बाळशंकर यांनी , म्हणाले की लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची लेखनी सर्वदूर पसरली असून.उंचीत आणि शोषित घटकाचे, विकासासंदर्भात व समानते संदर्भातील आहे.असे विचार व्यक्त केले.यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा हन्नुर , येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे त्यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, माजी सरपंच कोंडीबा सोनकांबळे, वंचित बहुजन आघाडी तालुका उपाध्यक्ष संतोष बाळशंकर यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक श्रीकांत राठोड सर ग्रामपंचायत सदस्य गौतम बाळशंकर, बालाजी पवार सर फिरदोस सय्यद मॅडम आदी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक श्रीकांत राठोड सर तर आभार फिरतो सय्यद मॅडम यांनी केले.





महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाराष्ट्राचे मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, सचिव विश्वनाथ चव्हाण, निजप्पा गायकवाड, धस सर, जोतिबा पारखे, गणेश भालेराव, राऊत, यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

# कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

अक्कलकोट/प्रतिनिधी : सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय,गीरजामाता मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय,मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या वतीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी , पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे यांच्याहस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शाभवी कल्याणशेट्टी, सीईओ सौ रुपाली शहा, ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, संचालक मल्लिनाथ मसुती



हे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे घेण्यात आली सौ कल्पना स्वामी व खंडेराव घाटगे यांनी लोकमान्य टिळक अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. यावेळी शिक्षक कर्मचारीवर्ग हजर होते..

# पाताळेश्वर माध्य.विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

निफाड/प्रतिनिधीः सिन्नर तालुक्यातील पाडळी पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली यानिमित्ताने विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या त्यातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले या प्रसंगी बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.बी.देशमुख यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांच्या अंगी असणाऱ्या गुणांचा अंगिकार करून भविष्यात खूप मोठे व्हावे व अण्णाभाऊ साठे सारखी जिद्द व चिकाटी अंगीकारून थोर बनावे,शांतता अंगी बाळगुन आपले कार्य तडीस न्यावे असे सांगितले

विद्यालयाचे उपशिक्षक आर.व्ही.निकम यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली आपल्या जीवनात महान व्यक्तीचे जीवन कार्य व त्यांचा त्याग आपल्या ध्यानी ठेवून आपणही आपल्या ध्येयाशी एकनिष्ठ राहून आपण अभ्यास करून आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी. सत्य,अहिंसा,सर्वधर्म समभाव या गुणांची जोपासना करावी असे सांगितले. अण्णाभाऊ साठेंच्या जीवन चरित्रावरती माहिती सांगून विद्यार्थ्यांनी त्यांचे गुण अंगीकारावे व जीवनात यशस्वी व्हावे.

याप्रसंगी वकृत्व स्पर्धेत सुजल शिंदे,विशाल घुले,आयुष शिंदे,श्रुती जाधव,रुही रेवगडे,आरोही शिंदे,प्रतिक्षा शिंदे,शौर्य शिंदे,कार्तिक पाटोळे,आदित्य भोर,निशाद नरड, वैष्णवी



शिंदे,शिवम रेवगडे,शिवम जाधव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट वकृत्व केले. यावेळी बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयाचे उपशिक्षक श्री टी.के. रेवगडे यांनी आभार मानले. यावेळी अक्षय सुरेश रेवगडे बी. आर. चव्हाण, आर.व्ही.निकम,एस.एम. कोटकर, आर. टी .गिरी, एम.सी. शिंगोटे, एम.एम.शेख, सविता देशमुख,सी.बी.शिंदे, के.डी. गांगुर्डे, एस.डी.पाटोळे, आर.एस.ढोली, ए.बी.थोरे हे उपस्थित होते.

# बार्टी संस्थेच्या वतीने अण्णाभाऊंना वाटेगावात अभिवादन



वाटेगाव/प्रतिनिधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक मा सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, विभागप्रमुख बार्टी पुणे यांनी विविध प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन बार्टी मार्फत करुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांचे जन्मस्थळ वाटेगाव जिल्हा सांगली येथे दिनांक १ आगस्ट २०२३ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुणाकती पुतळ्यास मा. ना. सुरेश खाडे, कामगार मंत्री तथा पालकमंत्री सांगली, खा. धैर्यशील माने, हातकणंगले, डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, विभागप्रमुख बार्टी पुणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

बार्टी मार्फत डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या मौल्यवान पुस्तक विक्री करणाऱ्या पुस्तक स्टालचे उद्घघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्टॉलमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य अल्प दरात बार्टी मार्फत उपलब्ध करून देण्यात आले होते. अण्णाभाऊ साठे सभागृहात अभिवादन कार्यक्रमात महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुण्याचे स्वागत डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी राज्यघटनेची प्रत व फकिरा कांदबरी देऊन केला.

मा.ना.सुरेश खाडे, यावेळी बोलतांना म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आज मि मंत्री आहे.लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे वाटेगाव येथे भव्य स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकारने नुकतेच २५ कोटी रुपये मंजूर केले असून यामुळे या परिसराच्या विकासाला गती मिळेल असे प्रतिपादन केले.

खा धैर्यशील माने यांनी अण्णाभाऊना अभिवादन करतांना आजही त्यांच्या लेखणीचे बिजे शालेय विद्यार्थ्यांत दिसून येतात असा गौरव केला तसेच अण्णाभाऊंनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली होती. बार्टी मार्फत महापुरुषांच्या विचाराचा प्रसार करणारी पुस्तके अल्प दरात उपलब्ध करून देण्यात येतात या उपक्रमाचे त्यांनी अभिनंदन करून बार्टीचे आभार मानले. डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, विभागप्रमुख बार्टी यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त करताना म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची दिशा स्वीकारून त्यांच्याबद्दल गौरव उध्दगार काढले त्यांच्या साहित्यात उपेक्षितांचा नायक दिसतो बार्टी संस्थेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे समग्र साहित्य प्रकाशित व प्रसिद्धी करण्यात येते आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय साहित्य संमेलन घेण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी मा. ना. सुरेश खाडे, कामगार मंत्री तथा पालकमंत्री, खा धैर्यशील माने, हातकणंगले, डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, विभागप्रमुख बार्टी, श्रीमती नंदिनी आवडे, अध्यक्षा जिल्हा जात पडताळणी प्रमाणपत्र समिती सांगली, जयंत चाचरकर, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, श्रीनिवास अर्जुन, प्रांतअधिकारी, प्रदीप उबाळे, तहसिलदार वाळवा, श्रीमती नंदाताई चौगुले, सरपंच वाटेगाव, डॉ प्रेम हनवते, प्रकल्प व्यवस्थापक बार्टी, विकास गायकवाड, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक बार्टी , समाधान दुधाळ, प्रकल्प अधिकारी, गणेश सवाखंडे, प्रकल्प अधिकारी समतादुत सांगली, रामदास लोखंडे यांच्यासह अभिवादन करण्यासाठी आलेले मान्यवर, ग्रामस्थ, विद्यार्थी, अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहीर राजेंद्र कांबळे, अमर पुणेकर, अशोक गायकवाड, आर के भोसले यांनी आपल्या संचासह महापुरुषांच्या विचारांचा जागर, प्रबोधन करुन प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रकाशन व प्रसिद्धी आणि समतादुत विभागांनी मेहनत घेतली. सुत्रसंचलन डॉ प्रेम हनवते यांनी केले. प्रस्ताविक विकास गायकवाड यांनी केले.आभार डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी मानले.

# समृध्दी महामार्ग दुर्घटनेतील सर्वजण महाराष्ट्राच्या बाहेरील असल्याने त्यांच्यासोबत भेदभाव होऊ नये : वैभव गिते

## मृत व्यक्तीच्या कुटुंबास पाच लाख रुपये देणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा..



माळशिरस/तालुका प्रतिनिधीः महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातल्या सरलांभबे गावाजवळ पुलाचं बांधकाम सुरू असताना, एक गर्डर मशीन कोसळल्याने ही घटना घडली आहे. दुर्घटनेतील मृतांचा आकडा २० वर गेला असून घटनेची माहिती मिळताच नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस या संघटनेचे राज्य सचिव वैभव गिते यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. उपस्थितांशी चर्चा केली तसेच समृद्धी महामार्गावर काम करीत असलेल्या परप्रांतीय कामगारांसोबत सुद्धा चर्चा केली.

त्यानंतर शहापूर उपजिल्हा रुग्णालयात जाऊन गंभीर जखमींची भेट घेण्यासाठी वैभव गिते हे सरकारी जिल्हा रुग्णालयात पोहचुन ३३ वर्षीय प्रेम प्रकाश यांची भेट घेतली. या दुर्घटनेतून ते थोडक्यात बचावले आहेत. त्यांच्या पायाला मोठी दुखापत झाली असून उपचार सुरू आहेत. ते मुळचे बिहारचे असून घरी आई, पत्नी आणि दोन लहान मुलं आहेत.आपला उदरनिर्वाह करण्यासाठी ते मजुरीच्या कामासाठी आले होते. डिसेंबर २०२२ पासून ते व्हिएसएल या कंपनीसाठी मजूर किंवा हेल्पर म्हणून काम करण्यास त्यांनी सुरुवात केली. त्याचवेळी ते शहापूरला आले.

माझ्या पायाला खूप लागलं आहे. पाय उचलू शकत नाहीय. अचानक पूर्ण लाँचर खाली आलं. काय झालं हे कळायच्या आतच दुर्घटना झाली होती. आम्ही सगळे लाँचरवर होतो आम्हाला गावातील ग्रामस्थांनी मदत केल्याची माहिती प्रेम प्रकाश यांनी वैभव गिते यांना दिली. तेथील वैद्यकीय अधिकारी यांची भेट घेऊन माहिती घेतली असता घटनेत २० जण मृत्यू पावले असून


**२० जणांची नावे कळली आहेत. या २० जणांची नावे खालीलप्रमाणे आहेत.**

१ )अरविंदकुमार उपाध्याय ३३ उत्तर प्रदेश
२)गणेश रॉय ४० पश्चिम बंगाल
३)ललन राजभर ३८ उत्तर प्रदेश
४)परमेश्वर सहानी २५ उत्तर प्रदेश
५)नितीनसिंह विनोदसिंह २५ उत्तरप्रदेश
६मनोजसिंह यादव ४९ बिहार
७)संतोष इलागोवन ३६ तामिळनाडू
८)राधेश्याम यादव ४० उत्तर प्रदेश
९)आनंदकुमार यादव २५ उत्तर प्रदेश
१०)पप्पूकुमार साव २० बिहार
११)कनन वेदर्थीनम २३ कर्नाटक
१२)सुब्रोत सरकार २३ पश्चिम बंगाल
१३)सुरेंदर पासवान ३५ उत्तर प्रदेश
१४)बलराम सरकार - पश्चिम बंगाल
१५)लवकुश रामुदिन सावुकुमार २८ बिहार
१६)प्रदीपकुमार रॉय ४४ पश्चिम बंगाल
१७)मंगेश शर्मा ३४ उत्तराखंड
१८)सत्यप्रकाश पांडे ३० बिहार
१९)रामाशंकर यादव ४६ उत्तरप्रदेश
२०)सरोजकुमार जगदीशकुमार १८ उत्तरप्रदेश

हे सर्वजण महाराष्ट्राच्या बाहेरील राज्यातील मजूर आहेत.

जखमींना शहापूरच्या सरकारी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. प्रिकास्ट केलेला कॉलम फिट करताना हा अपघात झाल्याच प्रत्यक्षदर्शी सांगत आहेत.समृद्धी महामार्ग मुंबई ते नागपूर ८१२ किलोमीटरचं अंतर कापण्यासाठी १४ तास लागतात. समृद्धी हायवेमुळे हे अंतर पार करण्यासाठी ८ तास लागतील असंही सांगितलं जात आहे. ७०१ किलोमीटर या महामार्गाची लांबी आहे.समृध्दी महामार्ग शहापूर दुर्घटनेतील मृत व जखमी सर्वजण महाराष्ट्राच्या बाहेरील असल्याने मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केलेली मदत व शासनाची इतर मदत त्यांच्यापर्यंत पोचली पाहिजे.परप्रांतीय असल्याने त्यांच्यासोबत व त्यांच्या कुटुंबियांच्या सोबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये याची काळजी शासनाने घ्यावी.

या सर्व कामगारांचा विमा काढला होता काय? शासनाच्या नियमांचे पालन केले होते काय? याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी असे वक्तव्य नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस या संघटनेचे राज्य सचिव वैभव गिते यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते भाउराव तायडे हे उपस्थित होते.



# महसूल सप्ताह दिनानिमित्त चपळगाव मंडळ येथे आधारकार्ड नवीन, दुरूस्ती शिबिर संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी : : महसूल सप्ताह दिनानिमित्त चपळगाव मंडळ येथे आधारकार्ड दुरूस्ती नवीन आधार कार्ड काढण्याचे कार्यक्रम घेण्यात आले. महसूल सप्ताह दिना निमित्त ग्रामीण विघा विकास विघालय चपळगांव विद्यार्थ सी युवा संवाद सादण्या त आले व महसूल सदर्भात विविध प्रकारचे दाखले बाबत मार्ग दर्शन देण्यात आले मंडळ अधिकारी राजकुमार् कोळी तलाठी चपळगाव ,जारवल सर, तलाठी सागर वाघमारे, तलाठी प्रदीप ढेंगळे, कोतवाल शिवशरण कोळी , प्राचार्य हणमंत दोडयाळकर, ग्रामस्थ रवी येबाजी, तलाठी हन्नुर दत्ता पांढरे गावातील प्रतिष्ठित नागरिक सुरेश सुरवसे व मुख्याध्यापक , सह शिक्षक विद्यार्थी विध्यर्थीन त्यांना सर्व प्रकारचे दाखला व आधार कार्ड लिंकिंग, दुरुस्ती रेशन कार्ड संबंधी यूव् सवंद साधले आणि मार्ग दर्शन केले

# महसूल विभागाची विकास कामांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका : जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे



उस्मानाबाद/ प्रतिनिधी : महसूल विभागाची विकास कामांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका आहे हे जबाबदारी ओळखून ती यशस्वीरित्या पार पाडावी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांनी शासनाच्या योजना जनतेपर्यंत सहज व सुलभ पोहचविण्या साठी कामाप्रती सकारात्मक दृष्टिकोन विकसित करावा असे आव्हान जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले. कळंब येथे रायगड मंगल कार्यालयात महसूल दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आणि दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी पोलीस उपाधीक्षक एम.रमेश, सहाय्यक जिल्हाधिकारी प्रियवंदा म्हाडळकर, अप्पर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, निवासी उप जिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे, सामान्य प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी संतोष भोरे, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, भुमच्या उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, कळंब चे उपविभागीय अधिकारी संजय पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी राजकुमार माने, विशेष भूसंपादन अधिकारी मांजरा प्रकल्प उदयसिंह भोसले, कळंब च्या तहसीलदार मनीषा मेने, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेलोरे, तसेच सर्व तहसीलदार,नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी,तलाठी, व इतर कर्मचारी उपस्थित होते.

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये जबाबदारीनुसार बदल केले पाहिजे. प्रशासनात आपली भूमिका नेहमी प्रशासक समन्वयक आणि नियंत्रण राहिले पाहिजे. अधिकाऱ्यांनी कोणत्याही आमुशाला बळी पडू नये व आपल्याला मिळत असलेल्या वेतनात समाधानी राहून जनतेची सेवा करावी. असेही जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे म्हणाले. आपल्या मुला मुलींना चांगले शिक्षण द्या, पाल्यांचे उच्च शिक्षण ही आपली खरी कमाई असते. येणाऱ्या पिढीला उत्तम प्रशासन आणि पारदर्शक सेवा देणे हा त्यांच्या भविष्याचा पाया भक्कम करण्यासाठी महत्त्वाची बाब ठरेल. त्यामुळे महसूल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढच्या पिढीचा विचार करून काम करावे. असे आव्हाने ही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महिंद्र कुमार कांबळे यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन वृषाली तेलोरे यांनी केले तर आभार तहसीलदार मनीषा मेने यांनी मानले, तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



# मोनेश्वर नरेगल यांनी वाढदिवसानिमित २५ सिमेंट विश्रांती बाकडे भेट

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्रीक्षेत्र अक्कलकोट नजीक असलेल्या समर्थनगर येथील वॉर्ड क्र.३ चे मोनेश्वर नरेगल यांनी वाढदिवसाच्या डामडौलाला फाटा देवून वार्डाच्या विकासात भर पडण्याकामी ग्रामस्थांच्या सोयी करिता ठिकठिकाणी २५ सिमेंट विश्रांती बाकडे देवून २५ वा वाढदिवसा साधेपणाने साजरा करण्यात आला.मोनेश्वर हे ग्रामपंचायत सदस्य होवून चार वर्षे पूर्ण होत आहेत. दरम्यान गेल्या चार वर्षामध्ये वृक्षारोपण, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले.

अनावश्यक खर्चाला फाटा देवून वार्डा रहिवाशांची सोय व्हावी. यादृष्टीने आजवर मोनेश्वर नरेगल यांनी कार्य केलेले आहे.मोनेश्वर नेरगल यांनी केवळ आपल्या वार्डापुरते न राहता समर्थनगरातील उपनगरामधील आबावाडी, जेऊर रोड, समता नगर, गुरुमित्र सोसायटी, बॅगेहळ्ळी रोड दत्त मंदिर, स्वागत नगर, राजे प्रतिष्ठान आदीसह विविध ठिकाणी सदरचे उपक्रम त्यांनी राबविलेले आहे. त्यांच्या या कार्याचे समर्थनगरवासियांतून कौतुक व स्वागत होत आहे.यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते उदय नगरेगल, ग्रा.पं.सदस्य सतिश खराडे, गोपाळ खराडे, किरण चव्हाण, अक्षय दळवी, प्रसाद साठे, संदीप बिराजदार, सोलनकर, अनिल बणजगोळ, समर्थ घाटगे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# दोन हजार रुपये घेऊन व्हीआयपी दर्शन देतो भाविकासह दोन एजंटची चौकशीच्या फेऱ्यात

पंढरपूर/प्रतिनिधीःपंढरपूरच्या विठ्ठलाची दर्शन मिळवण्यासाठी भाविकांकडून पैसे घेण्याचा प्रकार आज बुधवार दि २ ऑगस्ट रोजी उघडकीस आला आहे याबाबत दोघांची कसून चौकशी सुरू आहे दोष आढळल्यास डोहाळे गुन्हा दाखल केला जाईल अशी माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुलदवाड यांनी अशी माहिती दिली आहे. अधिक मास निमित्ताने पंढरपुरात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढत आहे नुकत्याच झालेल्या कमला एकादशी निमित्त पंढरपुरामध्ये चार ते पाच लाख भावी शनिवारी पंढरपूर मध्ये दाखल झाले होते दरम्यान श्री विठ्ठल दर्शनात भाविकांकडून पैसे घेऊन सोडण्याचे रॅकेट हा समोर आले आहे हैदराबाद येथील तीन भाविक दर्शनास आल्यानंतर त्यांना गाठून प्रत्येकी दोन हजार रुपये घेऊ विठ्ठल दर्शना सोडण्याचा प्रयत्न केला असल्याची



माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी कुदलवाड यांनी दिली दरम्यान मंदिर समिती मधील दर्शनामध्ये साखळीत कोण कोण सहभाग आहेत याच्या शोध घेणे गरजेचे आहे पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात अनेक वर्षापासून खाजगी एजंट द्वारे पैसे घेऊन व्हीआयपी पास सुरू असल्याची माहिती सूत्राकडून मिळत होती यामध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मधील कर्मचारी सहभागी असल्याशिवाय असे प्रकार घडले शक्य नाही असे मत स्थानिक व्यापारी व नागरिकांतून व्यक्त होत आहे

# अनंत चैतन्य प्रशालेत लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

अक्कलकोट/प्रतिनिधीः स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच अशी सिंहगर्जना करणारे महान स्वातंत्र्यसैनिक,थोर समाजसुधारक लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व शोषितांचा आक्रोश शब्दातून मांडणारे, थोर समाजसुधारक,लेखक, कवी, साहित्यरत्न



,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे साजरी करण्यात आली.प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक विलास बिराजदार सर यांच्या हस्ते या दोन्हीही महाविभुतींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तदनंतर प्रशालेचा इ. ८वी तील व वसतिगृहाचा विद्यार्थी कुमार योगीराज पवार यांनी स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य नेते बाळ गंगाधर टिळक यांच्याविषयी अतिशय सुंदर अशाप्रकारे मनोगत व्यक्त केल्यानंतर प्रशालेचे जेष्ठ शिक्षक व क्रीडा विभाग प्रमुख शहाजी माने सर यांनी या दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सुत्र संचालन सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे यांनी तर आभार सांस्कृतिक कार्यक्रम विभाग सहाय्यिका स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.

यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक अशोक साखरे , जेष्ठ शिक्षक निंगप्पा बिराजदार, सरदार मत्तेखाने, कलाशिक्षक राजेंद्र यंदे ,परिपाठ व विद्यार्थी पास विभाग प्रमुख सुरेश जाधव, छायाचित्र विभाग प्रमुख धनंजय जोजन,प्रा.काशिनाथ पाटील,प्रा.रविंद्र कालीबत्ते,प्रा. रमेश शिंदे, जेष्ठ शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, सांस्कृतिक कार्यक्रम सहाय्यिका मल्लमा चप्पळगाव व समस्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.